# वसंतदादा पाटील महाविद्यालय , पाटोदा जि.बीड.

## राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षिक अहवाल -२०२१-२०२२

दि. २१-०६-२०२१ रोजी महाविद्यालयात कोव्हिड-१९ चेसर्व नियम पाळुन योगा दिवस साजरा करण्यात आला. मोजक्या स्वंयसेवकासह काही महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी योगा दिनाच्या कार्यक्रमात सहभाग घेतला. दि.२६-०६-२०१ रोजी महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली. दि.२८-०७-२०२१ रोजी महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. दि.०१-०८-२०२१ रोजी महाविद्यालयात साहित्यरत्न आण्णा भाऊ साठे जन्म दिवस साजरा करण्यात आला. दि.१५-०८-२०२१ रोजी स्वातंत्रदिन साजरा करण्यात आला. दि. २३ऑगस्ट रोजी महाविद्यालयात विद्यापीठ वर्धापनदिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. दि. १७-०९-२०२१ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मराठवाडा मुक्ती संग्रामदिन साजरा करण्यात आला दि.२४-०९-२०२१ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करण्यात आला. दि.३०-०९-२०२१ रोजी महाविद्यालयात श्रमदानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.वृक्षा रोपणासह जुन्या वृक्षाचे संवर्धन करण्यात आले स्वच्छता मोहिम महाविद्यालयात राबवण्यात आली.वृक्षाला पाणी देण्यासाठी खड्डे तयार करण्यात आले यावेळी मोजक्या स्वंयसेवकासह महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी श्रमदानात सहभाग घेतला.

दि.०२-१०-२०२१ रोजी महाविद्यालयात महात्मा गांधीजीची जयंती साजरी करण्यात आली. दि.०४-१०-२०२१ रोजी संस्थेच्या संस्थापिका सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर यांच्य स्मृतीदिनाचा कार्यक्रम महाविद्यालयात साजरा कण्यात आला. यावेळी स्वर्गीय कांकूच्या कार्यवर प्रकाश टाकण्याचे काम प्राचार्याने केले. दि.०७-१०-२०२१ रोजी "आजादीका अमृत महोत्सव"या कार्यक्रमा अंतर्गत महाविद्यालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कोव्हिड-१९ चा काळ असल्यामुळे महाविद्यालयातील अनेक प्राध्यापकांनी वेळोवेळी स्वंयसेकांना मार्गदर्शन केले. दि.०१-०७-२०२१ ते ३०-०९-२०२१ या तीन महिन्याच्या कालावधीत चार ते पाच वेळा महाविद्यालयात स्वच्छता मोहिम राबविली.राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने एकूण ५१ वृक्षांची लागवड करण्यात आली.तसेच प्रत्येक आठवडयात दोन दिवसाप्रमाणे महाविद्यालयात श्रमदान करण्यात आले. गेल्या वर्षी लागवड केलेल्या वृक्षाची खड्डे दुरूस्त करून गाजर गवत निर्मुलन करण्यात आले.स्वंयसेवका मार्फत सर्व वृक्षांचे निगा राखण्याचे महत्वपूर्ण कार्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वंयसेवकांनी केले .वृक्षाला पाणी देण्याचे काम काही स्वंयसेवक करतात.या काळात महाविद्यालय व महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करण्यात आला.तसेच या अभियाना अंतर्गत घन कचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले.महाविद्यालय परिसरातील कुपनलिका,जलपूनर्भरण प्रकलपाचे नुतनी करण करण्यात आले वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

१३-१०-२०२१ रोजी महाविद्यालयात पद्मश्री वसंतदादा पाटील जन्म दिवस साजरा करण्यात आला.दि.१५-१०-२०२१ रोजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने अंतरराष्ट्रीय हात धुवा दिन साजरा करण्यात आला.यावेळी स्वंयसेवकासह काही महाविद्यालयीन कर्मचारीही उपस्थित होते.दि.२६-११-२०२१ रोजी महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने संविधानदिन साजरा करण्यात आला. दि.०९-१२-२०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात महापरी निर्वानदिन साजरा करण्यात आला.दि.०७-१२-२०२१ रोजी मा.नामदार जयदत्ता आण्णा क्षीरसागर यांच्या वाढदिवसा निमित्त महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ग्रामिण रूग्नालय पाटोदा जि.बीड येथे फळ वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. दि.२०-१२-२०२१ रोजी महाविद्यालयातराष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रसंत गाडगे बाबा स्मृतीदिन साजरा करण्यात आला.

दि.०५-०१-२०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. दि.११-०१-२०२२ राजमाता जिजाऊ जयंती साजरी करण्यात आली. दि. १४-०१-२०२२ रोजी महाविद्यालयात विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा करण्यात आला. यावेळी भिमगीताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.दि.२५-०१-२०२२ रोजी राज्यशास्त्र ,राष्ट्रीय सेवा योजना व यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक यांच्यावतीने " राष्ट्रीय मतदार दिन"या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. आबासाहेब हांगे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणुन तहसिलदार पाटोदा श्रीमती रूपाली चौघुले व नायब तहसिलदार गरड हे उपस्थित होते. मान्यवराच्या हस्ते राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजित रांगोळी स्पर्धाच्या विजेत्यांना प्रमाणपत्र देऊन विजेत्यांचा सत्कार करण्यात आला.या ठीकाणी मतदार प्रकियेत उत्कृष्ट काम करणाऱ्या BLO यांना देखील तहसिलदारांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. नायब तहसिलदार इंद्रजित गरड यांनी मतदार नोंदणी प्रक्रिया व भारतीय लोकशाहीत मतदानाचे महत्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तहसिलदार रूपाली चौघुले यांनी सर्वसामावेशक ,सुलभ आणि सहभागपूर्ण निवडणुका या विषयावर मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रोफेसर डॉ. आबासाहेब हांगे यांनी महाविद्यालयात कायम स्वरूपी मतदार नोंदणी कक्षाच्या स्थापनेची घोषणा केली. दि.२४-०१-२०२२ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय बालीकादिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रोफेसर डॉ. आबासाहेब हांगे यांनी स्वंयसेवकांना मार्गदर्शन केले.मुलींनी महाविद्यालयात नियमितपणे येणे कोणालाही घाबरण्याची गरज नाही.आपल्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आम्ही आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत असे प्रतिपादन केले.यावेळी मुला-मुलींच्या प्रमाणावर त्यांनी अध्यक्षीय समारोपात प्रकाश टाकला यावेळी महाविद्यालयातील चौदा मुलींचा प्रातिनिधीक स्वरूपात पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. दि.२६-०१-२०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजंना विभागाच्या वतीने महाविद्यालयात प्रजास्ताकदिन साजरा करण्यात आला.

दि.१०-०२-२०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात लोकशाही पंधरवाडयानिमित्त लोकशाहीत मतदानाचे महत्व या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रोफेसर डॉ. आबासाहेब हांगे होते तरर प्रमुख वक्ते म्हणुन डॉ.गफूर अहेमद शेख मिल्लीया महाविद्यालय बीड हे होते. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. आबासाहेब हांगे हे आपल्या उद्घाटनपर भाषाणात म्हणाले की, लोकशाहीत मतदानाचे महत्व अमूल्य आहे लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक व्यक्तिीने मतदान करणे अत्यंत गरजेचे आहे . त्यामुळे निवडणुका लोकसहभागातुन संपन्न होतात व देशाचा विकास होतो. प्रमुख मार्गदर्शक डॉ.गफूर शेख महणाले की, भारतीश लोकशही बळकट करण्यासाठी तीन मूल्य अत्यंत महतवाचे आहेत मतदार जागृती,मतदार नांव नोंदणी करणे व प्रत्यक्ष मतदान करणे हि तीन सुत्रे पाळली तर लोकशाही बळकट होईल व देशाचा विकास होईल. पुढे ते म्हणले की भरतीय निवडणुक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी झाली म्हणुन आपल्या देशात २५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिवस म्हणुन साजरा केला जातो.या कार्यकमात ५१ स्वंयसेवंकांनी सहभाग घेतला दि.१३-०२-२०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात संतसेवालाल महाराज जयंती साजरी केली .दि.१७-०२-२०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात नवगण शिक्षण संस्थेचे सचिव व बीड शहराचे प्रथम नागरीक तथा नगराध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांच्या वाढदिवसा निमित्त आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. या शिबीरात १५६ स्वंयसेवक व प्राध्यापकांचा सहभाग नोंदवण्यात आला. विविध प्रकारच्या तपासण्या करण्यात आल्या व रक्त नमुने संकल्ति करण्यात आले.कोव्हिड-१९ च्या सर्व नियमानचे पालण करून आरोग्य तपासणी शिबीराचे यशस्वी आयोजन करण्यात आले.दि.२३-०२-२०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात संत गाडगे महाराज व संत रोहिदास महाराज जयंती साजरीकरण्यात आली. दि.१९-०२-२०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली .दि.०८-०३-२०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात जागतीक महिला दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शीका प्रा.कावेरी खुरणे यांनी महिलांनी स्वंयम विकासाठी स्वत्वाची जागीव करुन घेणे आवश्यक आहे या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रोफेसर डॉ.आबासाहेब हांगे .यांनी महिलानी स्वत: जागृत रहावे असे मार्गदर्शन केले.दि.०५-०४-२०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात प्रियदर्शनी कन्या विद्यालयात रक्तक्षय या विषयावर सामन्य ज्ञान स्पर्धा घेण्यात आली.महाविद्यालयात पोषण अहार पंधरवाडया निमित्त राष्ट्रीय सेवा योजना व गृहशास्त्र विभागाच्या वतीने ही स्पर्धा घेण्यात आली .मुलींनी कोणता अहार घ्यावा या बाबत. प्रा.अर्चना चवरे यांनी मार्गदर्शन केले. दि.०५-०४-२०२२रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात दुसऱ्या कार्यक्रमाचे आयोजन कण्यात आले होते.मागास वस्तीतील माता आणि बालकांच्या आरोग्यासाठी पांरपारिक अहाराचे सर्वेक्षण करण्यात आले. याप्रसगी प्रश्नवलीच्या माध्यमातुन महिलोना नियमित अहारासंबंधी प्रश्न विचारून विविध प्रकारची माहिती संकल्ति करण्यात आली. यावेही

महिलांनी अहाराचे महत्व सांगण्यात आले बालकांचे पालण पोषण योग्य प्रकारे होण्यासाठी चांगल्या विचारा बरोबरच अहाराची आवश्यकता असते. आहार योग्य आणि चांल्य प्रतीचा घेतल्यास आरोग्य आबाधित रहाते असे मार्गदर्शन डॉ.सय्यद शानुर यांनी केले. दि.११-०४-२०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात पाटोदा शहरात "जलअभियान" कार्यक्रम राबविण्यात आला.एक प्रश्नावली तयार करून ती ज्यांच्यकडे बोरवेल्स आहेत त्यांच्या कडून भरून घेण्यात आली. दि.१९-०४-२०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात श्रमदानाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले .बगीचा स्वच्छ करण्यात आला. दि. २८-०४-२०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात ग्रामिण रुग्नालय पाटोदा यांच्या वतीने बुस्टर डोसची व्यवस्थाकरण्यात आली. छततीस स्वंयसेवकासह महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी याचा लाभ घेतला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य व कार्यक्रमाधिकारी डॉ.गणेश पाचकोरे,गट समन्वयक व कार्यमाधिकारी डॉ.यादव घोडके, डॉ.अनिता धारासुरकर,डॉ.पंडित सिरसट,डॉ.प्रमोद गायके ,डॉ.सय्यद शानुर, डॉ. दिनेश राऊत आणि डॉ. चंद्रशेखर बनसोडे यांनी प्रयत्न केले.

कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
वसंतदादा पाटील महाविद्यालय
पाटोदा,ता.पाटोदा जि.बीड

प्राचार्य
प्राचार्य
वसंतदादा पाटील कला,वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय,पाटोदा
ता.पाटोदा जि.बीड